जिल्हा निवड समिती

जिल्हा परिषद, वर्धा

## पदभरती मार्च २०१९

## जाहीर प्रकटन

(ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रं.संकिर्ण-२०२०/प्र.क्रं.९९/आस्था ८, दिनांक २० ऑगस्ट, २०२१ चे सहपत्र)

विवरणपत्र-अ

### जिल्हा परिषद वर्धाच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबधित पदभरतीबाबत जाहीर प्रकटन

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट-क संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी माहे मार्च,२०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थितीत महापोर्टल बंद झाल्याने सदरची परिक्षा प्रक्रिया पूर्ण होवू शकली नाही. दरम्यात कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभुमीवर तसेच इतर साथ रोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामीण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्रामविकास विभागातंर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबधित आरोग्य सेवक (पुरूष), आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ , औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गातील माहे मार्च, २०१९ मध्ये दिलेल्या जाहीरातीमधील नमुद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर जाहीरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदांचा सुधारीत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

संवर्ग :-आरोग्य पर्यवेक्षक

| प्रवर्ग | अजा | अ ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | ईडब्ल्युएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |

संवर्ग :-औषध निर्माता

| प्रवर्ग | अजा | अ ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | ईडब्ल्युएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ३ | ५ |
| सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ३ | ५ |

संवर्ग :-आरोग्य सेवक (पुरूष) ४०%

| प्रवर्ग | अजा | अ ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | ईडब्ल्युएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | ३ | ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ३ | १३ |
| सर्वसाधारण | ३ | ३ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ३ | १२ |
| माजी सैनिक | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकूण | ३ | ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ३ | १३ |

रिक्त १३ पदांपैकी १ पद L.V.(Low vision) दिव्यांग उमेदवारासाठी राखीव आहे.

**संवर्ग :-आरोग्य सेवक (पुरूष) ५०% हंगामी फवारणी कर्मचारी**

| प्रवर्ग | अजा | अ ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | ईडब्ल्युएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | ४ | ४ | १ | १ | २ | १ | १० | १ | ४ | १५ | ४३ |
| सर्वसाधारण | ३ | ३ | १ | १ | २ | १ | ५ | १ | ३ | १० | ३० |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| माजी सैनिक | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | ० | १ | २ | ७ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| एकूण | ४ | ४ | १ | १ | २ | १ | १० | १ | ४ | १५ | ४३ |

रिक्त ४३ पदापैकी २ पदे (१-LV-Low Vision, व १-D,HH-Deaf, Hard of Hearing) दिव्यांग उमेदवारासाठी राखीव आहे.

**संवर्ग :-आरोग्य सेवक (महिला)**

| प्रवर्ग | अजा | अ ज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | ईडब्ल्युएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या | १२ | ५ | ३ | ० | १ | २ | २७ | ० | १२ | ६२ | १२४ |
| सर्वसाधारण | ७ | ३ | ३ | ० | १ | २ | १७ | ० | ७ | ३९ | ७९ |
| खेळाडू | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ | ६ |
| माजी सैनिक | २ | १ | ० | ० | ० | ० | ४ | ० | २ | ९ | १८ |
| प्रकल्पग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ३ | ६ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| अंशकालीन | १ | १ | ० | ० | ० | ० | ३ | ० | १ | ६ | १२ |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| एकूण | १२ | ५ | ३ | ० | १ | २ | २७ | ० | १२ | ६२ | १२४ |

**(टिप:-आरोग्य सेविकांचे ०९ पदे कोर्टाच्या वेळोवेळी होणा-या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात येतील.)**

११५ पदापैकी ५ पदे (२-LV-Low Vision, १-D,HH-Deaf Hard Of Hearing, १-पद-OL-One Leg, CP-Cerebral Palsy, LC-Leprosy Cured, DW-Dwarfism, AAV-Acid Attack Victims, १ पद-SLD-Specific Learning Disadility, MI-Mental Illness, MD-Mulpiple disabilities) दिव्यांग उमेदवारासाठी राखीव आहे.

**संवर्ग प्रयोगशाळा तंत्रज्ञ भरावयाची पदे निरंक.**

**माहे मार्च,२०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबंधित पदांकरीता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी प्रकटनाद्वारे खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत :-**

१) माहे मार्च २०१९ मधील जाहिरातीनुसार आरोग्य विभागाशी संबधित पदांकरीता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवांरानी **www.maharddzp.com** या संकेतस्थळावर जावुन **Login ID** व **Password create** करणे आवश्यक आहे.

२) माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोग शाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गाकरीता आवेदन पत्र/ अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातुन अर्ज सादर केलेले उमेदवार संबधित प्रवर्गातुन परिक्षेकरीता पात्र राहतील.

३) मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्रं. १५७३७/२०१९ व इतर याचिकामध्ये शासकीय नोक-यांमधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थीकदृष्टया दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत क्रं. राआधो-४०१९/प्र.क्रं.३१/१६-अ, दिनांक २३ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवांराना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गातुन (EWS) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवांरानी आर्थिक दृष्टया दुर्बल प्रवर्गाबाबत (EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरीलप्रमाणे नमुद संकेतस्थळावर **दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१** या कालावधीत विकल्प द्यावेत.उमेदवारांने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापि, ज्या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांने आर्थिक दृष्टया मागास (EWS) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे, त्यांने परिक्षेपुर्वी सक्षम अधिका-यांचे आर्थिक दृष्टया मागस (EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे.परिक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गाचे (EWS) प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

४) जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाहीत तथापि खुल्या प्रवर्गातील वयोमर्यादेकरीता पात्र आहेत अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणुन गणण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी लागु असलेले परिक्षा शुल्क (यापुर्वी एसईबीसी प्रवर्गातुन अदा केलेली रक्कम वगळता उर्वरीत रक्कम) परिक्षेपुर्वी अदा करणे आवश्यक राहील. सदर उमेदवारांनी दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१ या कालावधीत वरीलप्रमाणे नमुद संकेत स्थळावरून शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरुन शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

५) माहे मार्च, २०१९ च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरीता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज सादर करण्याची मुभा होती. तथापि आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधुन परिक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरीता अर्ज सादर केले आहे अशा उमेदवारांनी परिक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरीलप्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहिल.

तसेच, अनुकंपा नियुक्ती व कारणामुळे माहे मार्च २०१९ च्या जाहीरातीतील काही प्रवर्ग रद्द झाले आहे, (सदर माहिती निरंक आहे.)

६) नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगांच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापुर्वी माहे मार्च २०१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातुन अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल. तसेच यापुर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगाच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगाकरीता नव्याने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे.

७) यापुर्वी उमेदवारांकडून लेखी परिक्षेस प्रत्यक्ष कोणत्या परिक्षा केन्द्रामधुन परिक्षा देणार आहे त्या परिक्षा केन्द्राबाबत प्राथम्यक्रम घेण्यात आले होते. सदर प्राधान्य क्रंमानुसार उमेदवारास संबधित जिल्हयातुन परिक्षेस बसण्याबाबत प्रवेशपत्र पाठविण्यात येईल.

८) माहे मार्च २०१९ च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरीता एका पदांकरीता एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांनी सर्व ठिकाणी परिक्षा शुल्क भरलेले आहे. तथापि उमेदवारांना एकाच ठिकाणी परिक्षा देता येणार असल्याने संबधीत उमेदवारांनी भरलेले अधिकचे परिक्षा शुल्क प्राप्त करून घेण्यासाठी वरीलप्रमाणे नमुद संकेत स्थळावर आवश्यक बॅक तपशिल नमुद करणे आवश्यक आहे.

९) विकल्प नोंदविताना काही अडचणी उद्धभवल्यास उमेदवांरानी ०७२९२००६३०५ या भ्रमणध्वनी संपर्क साधांवा.

वरीलप्रमाणे भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासन स्तरावर राखुन ठेवण्यात येतील.

**विवरणपत्र-ब**
**लेखी परिक्षेचे वेळापत्रक**

| अक्रं | पदांचे नाव | परिक्षेचा दिनांक | परिक्षेचा वेळ |
|---|---|---|---|
| १ | औषध निर्माता | १६ ऑक्टोंबर २०२१ | दुपारी ३.०० ते ५.०० |
| २ | आरोग्य सेवक (पुरूष) | १७ ऑक्टोंबर २०२१ | सकाळी ११.०० ते १.०० |
| ३ | आरोग्य सेविका | १७ ऑक्टोंबर २०२१ | सकाळी ११.०० ते १.०० |
| ४ | आरोग्य पर्यवेक्षक | १७ ऑक्टोंबर २०२१ | दुपारी ३.०० ते ५.०० |

(डॉ.अजय डवले)
जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती
जिल्हा परिषद, वर्धा

(प्रेरणा देशभ्रतार, भाप्रसे)
जिल्हाधिकारी वर्धा तथा,
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती,वर्धा